RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ६६] शुक्रवार, जून २३, २०२३/आषाढ २, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १३५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जून २०२३.

### अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलक्यूएन-२०२२/प्र.क्र.८२/अ-२.— भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम-१०९ च्या पोट-कलम (१) आणि (२) अन्वये महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रातील अंमलबजावणी संदर्भात प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम,२०१४" यामध्ये सुधारणा करण्याचे महाराष्ट्र शासनाने योजिले आहे. त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम-११२ प्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तीच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तींकडून महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव, (वने, भूसंपादन), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे वरील दिनांकापूर्वी येणाऱ्या/ प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना शासन विचारात घेईल.

### नियमांचा मसुदा

१. या नियमांना, "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (दुसरी सुधारणा) नियम, २०२३" असे म्हणावे.

२. “भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४” च्या नियम-१८ मध्ये,—

(१) उप-नियम (३) ऐवजी पुढीलप्रमाणे उप-नियम दाखल करण्यात येईल :–

“(३) द्यावयाची भरपाईची रक्कम ही, दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल व शंभर कोटी रुपयांपेक्षा कमी असेल, तर जिल्हाधिकारी, संबंधित महसूली विभागाच्या विभागीय आयुक्तांची पूर्वमान्यता घेईल आणि त्यानंतरच निवाडा घोषित करील.”;

(२) उप-नियम (३), च्या नंतर पुढील उप-नियम दाखल करण्यात येईलः-

“(३ क) द्यावयाची भरपाईची रक्कम ही, शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल, तर जिल्हाधिकारी, संबंधित महसूली विभागाच्या विभागीय आयुक्तांमार्फत प्रारुप निवाडा पूर्व मान्यतेस्तव राज्य शासनास सादर करील आणि राज्य शासनाची पूर्वमान्यता प्राप्त झाल्यानंतरच जिल्हाधिकारी निवाडा घोषित करील.”;

३. उक्त नियमांमधील उप-नियम (४) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुनिल कोठेकर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 23rd June 2023.

*NOTIFICATION*

Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

No. LQN-2022/C.R.82/A-2.— The following draft of rules which the Government of Maharashtra, proposes to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of section 109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by section 112 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 31st July, 2023.

2. Any objection or suggestion which may be received by the Principal Secretary (Forests, Land Acquisition), Revenue and Forests Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (2nd Amendment) Rules, 2023.

2. In rule 18 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014,—

(1) for sub-rule (*3*), the following sub-rule shall be substituted namely :—

"(3) If an amount of compensation to be paid is more than rupees ten crore and less than rupees one hundred crores, then the Collector shall get the previous approval of the Divisional Commissioner of the concerned revenue division and then only declare the Award.";

(2) after sub-rule (*3*), the following sub-rule shall be added namely :—

" (3A) If an amount of compensation to be paid is more than rupees one hundred crores, then the Collector shall submit the Draft Award for previous approval of the State Government through Divisional Commissioner of the concerned revenue division, and only after the previous approval of the State Government, the Collector shall declare the Award.";

(3) sub-rule (4) shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUNIL KOTHEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.